दैनिक गंधवार्ता
Daily Gandhawarta मंगळवार २८ जानेवारी २०२५




# संपादकिय

## ग्राहक प्रबोधन

ग्राहक प्रबोधन हा प्रकार म्हणजे रोग झाल्यावर उपचार करण्यापेक्षा तो रोग होवूच नये म्हणून खबरदारी घेण्यासारखे आहे. हे जरी खरे असले तरी आणि साक्षरतेचे प्रमाण 80 टक्क्यापर्यंत येवूनही लोक अजूनही फसतातच. याचे मूळ लोभात आहे. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण वाजवीपेक्षा जास्त काहीतरी मिळविण्याच्या नादात हातचेही गमावण्याची वेळ काहींच्यावर येवूनही अजून तेच तेच फसवणुकीचे प्रकार वारंवार घडत असतात. प्रबोधनामुळे हे प्रकार बंद करता येत नसले तरी कमी नक्कीच करता येवू शकतात. याची असंख्य उदाहरणे देता येतील. उदा. दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला शेतकरी पेरणीसाठी बाजारातून बी खरेदी करत असतो आणि दरवर्षी बियाणांच्या खरेदीत फसवणुकीचे प्रकार झाल्याचे आपणास कळते. आता या उदाहरणात प्रामुख्याने जो ग्राहक आहे तो थोडासा अशिक्षित किंवा अर्धशिक्षित असतो. म्हणून आपण समजू शकतो परंतु दुसर्‍या एखाद्या पतसंस्थेच्या गैरव्यवहाराच्या उदाहरणात आपल्या असे लक्षात येईल की इथला ग्राहक हा 100 टक्के सुशिक्षित होता तरीही आपापले पैसे पतसंस्थेत अडकवून बसला आहे. फसणारा आणि फसविणारा कधी कधी योगायोगाने एकमेकाचे शेजारी सुद्धा असू शकतात, हे दुर्दैव.

ग्राहक प्रबोधन हा विषय अतिशय महत्वाचा आणि आवश्यक विषय असूनही समाज मात्र त्याकडे अजूनही गंभीरपणे पहात नाही. ग्राहक प्रबोधनासाठी ज्या संघटना व जे कार्यकर्ते आपापला वेळ व पैसा खर्च करतात त्यांच्याकडे समाज कौतुकाने बघत नाही. त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकत नाही. हे कार्यकर्ते प्रबोधनासाठी जेव्हा समाजात जातात तेव्हा त्यांच्याकडे समाज अतिशय उदासीन नजरेने बघत असतो. समाजाची ही उदासीनता कार्यकर्त्याच्या दृष्टीने अतिशय मारक ठरते. त्यामुळे तरुण कार्यकर्ते या चळवळीत येण्याचे प्रमाण कमी आहे. तरीही प्रबोधनाची ही पताका या चळवळीतील कार्यकर्ते अभिमानाने आपल्या खांद्यावर घेवून चालतच आहेत. मात्र आता प्रशासन या कार्यकर्त्यांच्यासोबत असल्याने प्रबोधनाची गती वाढली आहे.

हे दैनिक मुद्रक -प्रकाशक - मालक संस्थापक संपादक शाम आबा अहिवळे यांनी ' विजया प्रिंटींग प्रेस' ११५ अ, मंगळवार पेठ, फलटण -४१५५२३ मु.पो.ता. फलटण जि.सातारा (महाराष्ट्र) येथे छापून, ११५ अ, मंगळवार पेठ, फलटण-४१५५२३ मु.पो.ता. फलटण जि.सातारा (महाराष्ट्र) येथेच प्रकाशित केले. * संपादक :- रोहित शामराव अहिवळे,मंगळवार पेठ, फलटण-४१५५२३. मु.पो.ता. फलटण जि.सातारा. (महाराष्ट्र) *(पीआरबी कायद्यानुसार संपादकिय जबाबदारी यांची राहील.) फोन. न. (०२१६६) २२०७६६, २२१११७ फलटण.

DC/1/Decleration/Sr-26/03 RNI No. MAH/MAR/2003/12379Daily GANDHAWARTA, Phaltan Regd. No. STR/ 037 /2022- 2024

E-mail- rohya7@rediffmail.com

Website- www.gandhawarta.com

स्थापना वर्ष-१९८७ फॅक्स नंबर - (०२१६६) २२१११७

संस्थापक संपादक शाम आबा अहिवळे

संपादक :- अॅड.रोहित अहिवळे, मो. ९९६०८८५००७

कार्यालीयीन पत्ता :- ११५, अ, मंगळवार पेठ, फलटण - दैनिक गंधवार्ता साप्ताहिक सुट्टी - दर बुधवारी ४१५५२३ फोन :- २२१११७

या प्रकाशनात व्यक्त झालेल्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही,या प्रकाशनासंबंधीच्या दैनिकासंबंधी सर्व खटले, वादविवाद प्रकरणे, फलटण न्यायालयांतर्गतच ! अन्यत्र कोठेही नाहीत. - संपादक

# नवीन आणि सशक्त महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प करूया - राज्यपाल

मुंबई, दि. २६ : सर्व समाजघटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित समारंभात दिली. सर्वांनी एकत्र येऊन नवीन आणि सशक्त महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प करूया आणि एक ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करूया, असे आवाहन त्यांनी केले.

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) येथे आयोजित मुख्य शासकीय समारंभात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते ध्वज फडकवून राष्ट्रध्वजाला वंदन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) डॉ. निखिल गुप्ता, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, तिन्ही सेना दलांचे वरिष्ठ अधिकारी, राज्यपालांच्या पत्नी सुमती, दक्षिण ऑस्ट्रेलिया राज्याचे मंत्री जो. झेकॅक्स, विविध देशांच्या वकिलातीमधील वरिष्ठ पदाधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, वीर सावरकर आणि सर्व महान नेते आणि समाजसुधारक यांना अभिवादन करून राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी राज्यातील जनतेला प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, महाराष्ट्र सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येत्या १०० दिवसांत लोककल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांना गती देण्यासाठी सर्व विभागांना आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. याचबरोबर सर्व सरकारी सेवा सामान्य लोकांपर्यंत पोहोचत असल्याची खात्री करण्यासाठी ऑनलाइन आणि मोबाइल प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

सरकारी कामाला गती देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चा उपयोग केला जात आहे. गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी 'महापे' येथे सायबर सुरक्षा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे, ज्यामुळे पोलिसांना गुन्ह्यांच्या तपासात मदत होईल. थेट विदेशी गुंतवणुकीसाठी (एफडीआय) महाराष्ट्र हे सर्वाधिक पसंतीचे ठिकाण राहिले आहे आणि एफडीआय आकर्षित करण्यात राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे, ही अतिशय अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. खरीप हंगाम



२०२३ करिता कापूस व सोयाबीन उत्पादन करणाऱ्या राज्यातील ६८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये २ हजार ८०० कोटींहून अधिक रकमेची आर्थिक मदत जमा करण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले.

उदंचन जलविद्युत प्रकल्प धोरणांतर्गत, सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) द्वारे ३८ प्रकल्पांसाठी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या प्रकल्पांमुळे ५५,९७० मेगावॅट वीज निर्मिती करण्यात मदत होईल आणि २.९५ लाख कोटी इतकी गुंतवणूक आकर्षित होईल. याशिवाय ९०,३९० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णय घेण्याची भूमिका मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू करण्यात आलेली आहे. याअंतर्गत राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील विवाहित महिला, विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता आणि निराधार महिला आणि अशा कुटुंबातील एका अविवाहित महिलेला १५०० रुपये प्रति महिना दिला जात असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. या योजनेंतर्गत जुलै २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत सुमारे २ कोटी ४६ लाख महिला लाभार्थ्यांना सुमारे २१ हजार कोटी रुपयांचा आर्थिक लाभ देण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी ऑलिम्पिक स्पर्धेतील पदक विजेत्यांसाठी रोख बक्षिसामध्ये ४ ते ५ पटीने वाढ करण्यात आलेली असून जागतिक स्तरावरील स्पर्धेत पदक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना देण्यात येणाऱ्या रोख पारितोषिकांच्या रकमेत देखील दहा पटीने वाढ करण्यात आली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी राज्यपाल यांच्या भाषणाचा मराठी अनुवाद अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी वाचून दाखवला.

संचलनात विविध पथकांचा सहभाग - यावेळी झालेल्या संचलनात भारतीय नौदल, गोवा पोलीस, महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दल, बृहन्मुंबई पोलीस सशस्त्र दल, बृहन्मुंबई पोलीस दंगल नियंत्रण पथक, बृहन्मुंबई सशस्त्र महिला पोलीस दल, मुंबई लोहमार्ग पोलीस दल, गडचिरोली व गोंदिया जिल्ह्याचे सी-६० पथक, गृहरक्षक दल (पुरुष), बृहन्मुंबई वाहतूक पोलीस दल, गृहरक्षक दल (महिला), राज्य उत्पादन शुल्क विभाग, वन विभाग, मुंबई अग्निशमन दल, बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल, सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा, नागरी संरक्षण दल (पुरुष/ महिला), राष्ट्रीय सेवा योजना (मुले/मुली) एम.सी.एम गर्ल्स हायस्कूल काळाचौकी, सी. कॅडेट कोअर (मुली), सी. कॅडेट कोअर (मुले), रोड सेफ्टी पेट्रोल (मुली) रुस्तमजी इंटरनॅशनल स्कूल, दहिसर मुंबई, रोड सेफ्टी पेट्रोल (मुले) डॉ. अँटोनिओ डासिल्वा हायस्कूल दादर, मुंबई, रोड सेफ्टी पेट्रोल (मुली) अंजुमन ए इस्माईल हायस्कूल, बांद्रा मुंबई, रोड सेफ्टी पेट्रोल (मुले) रुस्तमजी इंटरनॅशनल स्कूल, दहिसर मुंबई, रोड सेफ्टी पेट्रोल (मुली) मनपा शाळा पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई, रोड सेफ्टी पेट्रोल मनपा माणिकलाल एम. पी. एस इंग्लिश हायस्कूल, घाटकोपर मुंबई, स्टुडन्ट पोलीस कॅडेट (मुले-मुली) बृहन्मुंबई महानगरपालिका ब्रास बँड पथक, पाईप बँड पथक, महिला निर्भया वाहन पथक, नौदलाची वाहने, अग्निशमन दलाची वाहने आदींनी सहभाग घेतला. कमांडर सुमितसिंग चौहान हे संचलन प्रमुख होते.

संचलनात सहभागी वाहने

यावेळी भारतीय नौदलाचे एअरक्राफ्ट कॅरिअर (आयएनएस विक्रांत) (विमान वाहक युद्ध पोत), भारतीय नौसेना सुरत (विध्वंसक युद्ध पोत), वाघशीर पाणबुडी, तेजस फायटरजेट अँड अनमॅनेड एरियल व्हेईकल (हवेतून हवेत व जमिनीवर मारा करणारे क्षेपणास्त्र), ब्रह्मोज मिसाईल (जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे क्षेपणास्त्र), वरुणास्त्र टोरपेडो, इंडीजिनीअस रॉकेट लॉन्चर वेपन (पाण्यावरून पाण्याच्या आत मारा करणारे क्षेपणास्त्र) तर बृहन्मुंबई पोलीस दलाचे वाहतूक पोलीस मोटर सायकल पथक (४० गाड्या) आणि महिला निर्भय पथक (चार वाहने), तसेच बृहन्मुंबई अग्निशमन दलातील मिनी वॉटर टेंडर, २४ मीटर उंचीचे कम्बाईन फायर आणि ३२ मीटर टर्न टेबल लॅडर या वाहनांचा समावेश होता.

जनहिताचे संदेश देणारे चित्ररथ- राज्य शासनाच्या विविध विभागांनी जनहिताचे संदेश देणाऱ्या चित्ररथांसह संचलनात सहभाग घेतला. यामध्ये सहभागी झालेले विभाग (कंसात चित्ररथाचा विषय) पुढील प्रमाणे : सार्वजनिक बांधकाम (२४ तासात अष्टविनायक दर्शन), वन (आईच्या नावे एक झाड), आदिवासी विकास (वाघबारस), पर्यटन (महाराष्ट्र अनलिमिटेड), मराठी भाषा (अभिजात मराठी), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (अनुसूचित जाती आणि विशेष घटकांचा सर्वांगीण विकास), मृद व जलसंधारण (जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण), कृषी (नैसर्गिक शेती), ऊर्जा (अक्षय ऊर्जा), अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण (शाश्वत अन्नपूर्णतेकडून सर्वस्पर्शी अन्न शाश्वततेकडे), पाणीपुरवठा आणि स्वच्छता (अटल भूजल योजना आणि जलजीवन मिशन), इतर मागास बहुजन कल्याण (ज्ञानदीप समतेचा), ग्रामविकास व पंचायत राज (लखपती दीदी आणि ग्रामीण घरकुल), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता (कौशल्ययुक्त महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (झोपडपट्टी पुनर्वसन), नगरविकास (सिडको)(शहरांचे शिल्पकार), गृह (वाहतूक नियंत्रण शाखा)(गतिमान रस्त्यांचे रक्षक), कामगार (महाराष्ट्राची शान कामगारांचा सन्मान) सांस्कृतिक कार्य (महाराणी ताराराणी यांचे ३५० वे जन्म वर्ष).

प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित या समारंभात सांस्कृतिक कार्य संचालनाकडून किरण सुरेश शिंदे, अरुण सुरेश शिंदे, विवेक विनोद शिंदे, अरुण सुरेश शिंदे यांनी सनई चौघडा वादन केले. तर शिवानी जोशी आणि नरेंद्र बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

# लोककल्याणाचा विचार डोळ्यासमोर ठेवून विधानमंडळाची वाटचाल - सभापती प्रा. राम शिंदे



मुंबई, दिनांक २६ जानेवारी भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विधान भवन, मुंबई येथे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी ध्वज फडकवून राष्ट्रध्वजाला वंदन केले. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

आपले विधानमंडळ लोककल्याणाचा विचार दीपस्तंभाप्रमाणे डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करीत आहे, असे सांगून सभापती प्रा. शिंदे यांनी विधानमंडळाचे काम अधिक प्रभावी होण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास विनाव्यत्त्यय होणे, समिती पद्धत अधीक सक्षम करणे, चर्चेनंतरच विधेयक संमत होणे आणि अर्थसंकल्पीय बाबींवर सदस्यांना मार्गदर्शन, ही आपली पीठासीन अधिकारी म्हणून कामकाज अग्रक्रमासाठी चतु:सुत्री राहील, असे यावेळी स्पष्ट केले. भारतीय प्रजासत्ताक आणि भारतीय राज्यघटना अमृत महोत्सवाच्या सर्वांना शुभेच्छा देत राज्यघटनेमुळे भारतातील संसदीय लोकशाही वैश्विकस्तरावर अधिक प्रभावी आणि प्रगल्भ झाल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा लोककल्याणकारी राज्य संकल्पनेचा विचार पुढे नेला. त्यांच्या जन्म त्रिशताब्दीनिमित्त प्रा. राम शिंदे यांनी अभिवादन केले.

याप्रसंगी विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (१) (कार्यभार) जितेंद्र भोळे, सचिव (२) (कार्यभार) डॉ. विलास आठवले यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## महाबळेश्वर येथील पर्यटन महोत्सव सर्व विभागांनी समन्वयातून यशस्वी करावा

(पान १ वरुन)नाही यासाठी आराखडा तयार करावा. तसेच वाहन पार्कींगसाठी जागा शोधण्याचे काम करावे.

पर्यटन महोत्सव कालावधीत हेलीकॉप्टर सफर ठेवण्यात येणार आहे. यासाठी दोन हेलीपॅड तयार करावे. यासाठी जागा बघुन ठेवा. महोत्सव कालावधीत ज्यादा विद्युत पुरवठा लागणार आहे. विद्युत पुरवठा खंडीत होवू नये यासाठी विद्युत वितरण कंपनीने दक्ष रहावे तसेच जनरेटरचीही व्यवस्था करावी. महाबळेश्वर येथील रस्त्यांची कामे हातात घ्यावी. तसेच विविध उद्यांने चांगल्या पद्धतीने ठेवावीत. पाचगणी व महाबळेश्वर या कालावधीत स्वच्छ असले पाहिजे यासाठी जास्तीचे मनुष्यबळ उपलब्ध करुन घ्यावे, अशा सूचना करुन महाबळेश्वर येथे होणारा पर्यटन महोत्सव यशस्वीरित्या आयोजन करुया, असेही पालकमंत्री श्री. देसाई यांनी सांगितले.



फलटण नगर परिषद, फलटण

कार्यालय क्रमांक - ०२१६६ - २२२३२५, २२१७६७ टोल फ्री क्रमांक - १९१३
Email ID- cophaltan@gmail.com
Web Site - www.phaltanmunicipalcouncil.org
Web Mail - maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.फनप/साप्र/ /२०२५ दिनांक - २०/०१/२०२५

जाहीर सुचना

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५-
अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित केलेबाबत

शहरातील तमाम नागरिकांना, सामाजिक-शैक्षणिक-वाणिज्य संस्था, राजकीय पक्ष, शासकीय व निम शासकीय सर्व कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत शासन निर्देशानुसार निर्देशित असलेल्या एकुण ६७ सेवा अधिसुचित करून प्रसिध्द करणेचे आहेत. यासाठी सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम, समयोचित व विवित कालमर्यादित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज कागदपत्रासोबत सादर केल्यास फलटण नगरपरिषदेकडून आवश्यक लोकसेवा वेळेत दिली जाईल. त्याअनुषंगाने नगर परिषदेकडील संबंधित विभागाचे जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. अशी पदनिर्देशित केलेली यादी नगरपरिषदेच्या नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

सही
(निखिल मोरे)
मुख्याधिकारी
फलटण नगर परिषद फलटण

Scanned with CamScanner